एल.ए.आर.नं. ४२/२००५
नर्मदा वि. महाराष्ट्र शासन
निशाणी क्र. ५३

गैरअर्जदार क्र.३ आणि ४ तर्फे साक्षीदार क्र.१ मुरलीधर जियालाल टेंभरे,
<u>सरतपास गैरअर्जदार क्र. ३ आणि ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. मोहरिल यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे आणि तो मला समजावून सांगण्यात आला आहे. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी गाव नकाशाची प्रत दाखल केलेली आहे. तसेच पुर्वी, सदर प्रकरणामध्ये झालेल्या न्यायनिर्णयाच्या झेरॉक्स प्रती दाखल केलेल्या आहेत. त्याच प्रमाणे मला एम.एस.ई.बी. कार्यालयाने, या प्रकरणामध्ये साक्ष देण्याकामी दिनांक २४ मार्च २०२६ रोजी, पत्र दिलेले आहे. अर्जदार यांनी सदर कागदपत्रांना निशानी देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले. सबब, सदर दस्तांना अनुक्रमे निशानी ५४ ते ५८ देण्यात येत आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>उलटतपास अर्जदारातर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. कुशवाह यांद्वारे -</u>

३. सदर सर्वे नंबर मी पाहिलेला आहे. सदर सर्वे नंबरला पाण्याची सोय होती. तसेच लहान कॅनलची देखिल पाण्याची सोय होती. पश्चिम बाजुला नाला होता किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या ठिकाणी संत्रा आणि मोसंबीची झाडे होती. वादग्रस्त मिळकतीवर जातेवेळी माझ्यासोबत भुसंपादन अधिकारी, तसेच तालुक्याचे कृषी अधिकारी, इत्यादी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की सर्व गोष्टींचे निरीक्षण झाल्यानंतर अवार्ड पारित करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की कलम ९ खाली नोटीस देतांना, जमिन धारकांना किती किंमत त्यांना अपेक्षीत आहे याची विचारणा केली जाते. अवार्डच्या आगोदर झाडाचे पैसे कोणालाच दिले नव्हते.

संबंधीत मालकांनी झाडाचे पैसे घेतले किंवा नाही, हे मला आज रोजी आठवत नाही. तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पारशिवनी हे देखिल सर्वे करतांना हजर होते.

५. मी सन २०१६ मध्ये निवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की मी सेवानिवृत्त झाल्यापासुन माझ्या कार्यालयाशी माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या अधिकार पत्रामध्ये, कोणत्या शेतीबददल अथवा कोणत्या केसमध्ये पुरावा दयायचा आहे याचा उल्लेख नाही. मी १९९८ पासुन ते २०१६ पर्यंत खापरखेडा आणि कोराडी या दोन विभागामध्ये, जुनियर इंजिनियर ते अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणुन निवृत्त झालो. माझे कार्यक्षेत्र हे खापरखेडा आणि कोराडी येथील थर्मल पावर स्टेशनमध्ये सिव्हील डिपार्टमेंट मध्ये मी कार्यरत होतो. गावांच्या सर्वेचे काम हे कार्यालयाच्या सर्व टिमने केलेले आहे. सदर टीमचा मी एक भाग होतो. सर्वेमध्ये मी असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला सर्वे करण्याबाबतचे अधिकार पत्र संबंधीत विभागाने दिले नव्हते. सदर कामाबाबत लेखी आदेश देण्याचा कोणताही प्रश्न येत नाही कारण सदर काम करणे हे आमच्या विभागाचे काम होते.

६. संपादित गाव हे, नागपुर पासुन किती अंतरावर आहे हे दाखविण्याकामी मी गाव नकाशा दाखल केला असुन इतर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अंतर हे गाडीच्या ओडोमिटरप्रमाणे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की संपादित मिळकत ही रोडला लागुन आहे. संपादनाच्या वेळेस, संपादित जमिनीला लागुन कच्चा रोड होता. संपादित जमिनीला, काही भागांसाठी केनॉलची सोय होती. तसेच काही जमिनींना विहिरीच्या पाण्याची सोय होती. हे म्हणणे खरे नाही की संपादित झालेल्या जमिनीच्या हया बागायती होत्या. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की जमिनी या ओलीत होत्या किंवा नाही याचा उल्लेख सातबा-याच्या उता-यावर आहे. मी वैयक्तीक रित्या प्रत्येक जमिनीची माहिती सांगु शकत नाही. जमिनीचे मुल्यांकन मी केलेले नाही, जमिनीचे मुल्यांकन गैरअर्जदार नं.२ यांनी केले आहे. गावामध्ये ग्रामपंचायत, शाळा, विद्युत आहे. हॉस्पीटल

अथवा सभागृह असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की संपादित जागा हया, नॅशनल हॉयवेला लागुन आहेत. हे म्हणणे खरे नाही की संपादित जागा हया राष्ट्रीय महामार्गापासुन एक किलोमिटर अंतरावर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की अडीच ते तीन किलोमिटर आहे. राष्ट्रीय महामार्गापासुन सर्वात जवळची आणि लांबची जमिन मी सांगु शकत नाही. गावनकाशा मी बनविलेला नाही. गावनकाशा कोणी बनविलेला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की वाद विषयाबाबत मला कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

L.A.R. No. 106-2005

SARODE SANDEEP MARUTI

Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.05.11 16:46:25 +0530

दिनांक ११/०५/२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)